महाराष्ट्र शासन
# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिकामार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१
www.dvet.gov.in ;desk२@dvet.gov.in ;०२२-२२६२०६०४/२९३

क्रमांक : २/आस्था-०४/काट्रेज रिरिसा दरपत्रक /२०२४/ ९४८ दिनांक : 22 FEB 2024

प्रति,

------------------------

------------------------

------------------------

**लेजर प्रिंटर व झेरॉक्स मशीनसाठी लागणाऱ्या लेझर काट्रेज टोनर रि-फिलिंग व रि-इंजिनिरिंग करणेसाठी दरपत्रक वर्ष २०२३-२०२४ व २०२४-२०२५**

१) दरपत्रक सादर करण्याची मुदतीचा अंतिम दिनांक :- 04/03/2024 सायं ०६:१५ वाजेपर्यंत

२) दरपत्रक उघडण्याचा दिनांक :- 05/03/2024 दु. २:०० वाजता

३) दरपत्रक उघडण्याचे ठिकाण :- मा. उपसंचालकाचे दालन, पहिला मजला, मुख्य इमारत, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रशिक्षण संचालनालय मुंबई -१.

इच्छुक पुरवठादारांनी खालील अटी व शर्तीच्या अनुसार दरपत्रक सादर करावे.

१. दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यात सादर करावे. सदर लिफाफ्यावर ठळक अक्षरात लेजर प्रिंटर व झेरॉक्स मशीनसाठी लागणाऱ्या लेझर काट्रेज टोनर रि-फिलिंग व रि-इंजिनिरिंग करणेसाठी दरपत्रक असे नमुद करावे व ज्या पत्र क्रमांकानुसार दरपत्रक मागविण्यात आलेले आहे, त्या पत्राचा क्रमांक व दिनांक नमुद करुन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई -१ या पत्यावर हस्तपोच सादर करावे.
२. टपालाद्वारे /मेलद्वारे/ कुरीअरद्वारे प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.
३. सदर पाकीटात लखोटा क्रमांक १ मध्ये सर्व तांत्रिक कागदपत्रे जोडुन सिलबंद करण्यात यावा व त्यावर **तांत्रिक कागदपत्रे** असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
४. लखोटा क्रमांक २ मध्ये वित्तीय दर सर्व करांसहीत नमुद करुन लखोटा सिलबंद करण्यात यावा व त्यावर **दरांचा लखोटा** असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
५. दरपत्रकात वस्तु व सेवेसाठीचा दर वस्तु व सेवाकरांसहित ( GST) समाविष्ठ करण्यात यावेत.

६. लखोटा क्रमांक १ ( तांत्रिक कागदपत्रे ) मधील दर्शवीलेली प्रमाणपत्रे अपुर्ण असल्यास लखोटा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही.

७. कोणतीही गोंधळात राहणारी किंवा वेगवेगळे अर्थ न निघणारी बाब दरपत्रकात राहणार नाही याची काळजी घ्यावी.

८. संस्थेकडुन अटी नमुद करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. संचालनालयाकडुन याबाबत सबबी एकुण घेतल्या जाणार नाहीत व त्याबाबत पत्रव्यवहार करण्यास संचालनालय बांधील राहणार नाही.

९. सदर कामकाजासाठी वाहनखर्च इंधन खर्च इत्यादीचा विचार करुन दर भरावेत याकामी कोणतीही अग्रिम रक्कम मिळणार नाही.

१०. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-४०० ००१ यांनी राखून ठेवलेला आहे.

११. दरपत्रक उघडण्याच्या वेळेत आपण अथवा आपला प्रतिनिधी योग्य त्या ओळखपत्रासह हजर राहू शकतो. काही प्रशासकीय वा कार्यालयीन अडचणीमुळे दरपत्रक उघडणे शक्य झाले नाही तर लगतच्या नंतरच्या दिनांकास वा संचालनालयाच्या सोयीनुसार ठरवून दिलेल्या दिवशी उघडण्यांत येतील.

१२. दरपत्रक मधील साहित्याचे भाव कमीत कमी ०१ वर्षाकरिता बंधनकारक राहतील.

१३. मंजुर होणाऱ्या संस्थेसोबत रुपये ५००/- रकमेच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करण्यात येईल.

१४. दरपत्रकामधील सेवा सर्वसाधारणपणे ज्यांना सेवा देण्याबाबत कार्यादेश देण्यात आलेले आहेत त्यांनी वस्तु व सेवा कर ( GST) क्रमांक व इन्कम टॅक्स क्लियरंस सादर करणे अपेक्षित आहे.

१५. टोनर रिफिलिंग करतेसमयी भरण्यात येणारी पावडर उत्तम दर्जाची ( ब्रँडेड कंपनीची ) असावी तसेच टोनर रिफिलींग मशीनद्वारे करण्यात यावे.

१६. टोनर रि-फिलिंग/ रि-इंजिनिरिंग मध्ये काही दोष आढळुन आल्यास, प्रती सुस्पष्ट येत नसल्यास सदर टोनर निशुल्क व तात्काळ बदलुन देणे आवश्यक राहील.

१७. निश्चित करण्यात आलेल्या प्रिंटर्सचे टोनर टोनर रि-फिलिंग/ रि-इंजिनिरिंग करणाऱ्या संस्थेने मान्य दराने पुरवठा केलेला नसल्यास सदर कामाबाबतची तीव्रता लक्षात घेवुन रकमेच्या दंडाची आकारणी करण्याचे अधिकार संचालनालयास राहतील .

१८. सर्व साधारणपणे ज्यांना मालाचा पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत त्यांनी वस्तु व सेवा कर (G.S.T.) क्रमांक व इन्कम टॅक्स क्लियरन्स प्रमाणपत्र सादर करणे अपेक्षित आहे

१९. लेजर प्रिंटर व झेरॉक्स मशीनसाठी लागणाऱ्या लेझर काट्रेज रिफिलिंग / रि-इंजिनिअरिंग करणेसाठी यांचा वॉरंटी कालावधी वापरण्यात आल्याचा दिनांकापासुन ०१ वर्षापर्यंत

Scanned with OKEN Scanner

असेल, या कालावधीत निर्माण होणाऱ्या त्रुटी व इतर खोळंबा याची संपुर्ण निराकरण करणे आवश्यक राहील.

२०.प्रिंटर्सचे टोनर रि-फिलिंग/ रि-इंजिनिरिंग करणेसाठी आदेश दिले असता त्याचे बील तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावे. तसेच सदर मालाचा पुरवठा झाल्यानंतर सदर वस्तु चांगल्या स्थितीत व त्याची तपासणी झाल्यानंतर रक्कम मिळले.

२१. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-४०० ००१ यांनी राखून ठेवलेला आहे.

२२. सदर पुरवठ्याबाबत काही वाद उद्भल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण ( कोर्ट मॅटर ) झाल्यास त्याचे कार्यक्षेत्र मुंबई येथील न्यायालयात अपील करणे बंधनकारक राहील.

( झेरॉक्स मशीन व प्रिंटर काट्रेज यांची यादी सोबत जोडल्याप्रमाणे राहतील )

सदर दरपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थरावर www.dvet.gov.inवर download section मध्ये उपलब्ध आहे.

( निधि चौधरी )
आयुक्त ( भा. प्र. से.)
कौशल्य, रोजगार, उद्योजकता आयुक्तालय
(व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

Scanned with OKEN Scanner

संचालनालयातील लेजर प्रिंटर व झेरॉक्स मशीनसाठी लागणाऱ्या लेझर काट्रेज टोनर रि-फिलिंग व रि-इंजिनिरिंग करार दरपत्रक

## तांत्रिक लखोटा क्रमांक १

१. संस्था नोंदणीकृत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र.

२. संस्थचे/ प्रोप्रायटर यांचे पॅन कार्ड.

३. वस्तु व सेवा कर ( GST ) नोंदणी प्रमाणपत्र.

४. शासन अंगीकृत संस्थामध्ये काळ्या यादीत नाव नसल्याबाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.

५. शासकीय कार्यालयात सेवा पुरविण्याचा अनुभव असल्यास त्याचा तपशिल नमुद करुन स्वयंघोषणापत्र.

६. सेवेचा पुरवठा करण्यास जास्तीत जास्त किती वेळ लागेल याबाबत स्वयंघोषणापत्र.

( निधि चौधरी )
आयुक्त ( भा. प्र. से.)
कौशल्य, रोजगार, उद्योजकता आयुक्तालय
(व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

Scanned with OKEN Scanner

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००१

दरपत्रक क्रमांक २/आस्था-०४/कार्ट्रेजि रिरिसा/ दरपत्रक २०२४/ दि. ज्या अनुषंगाने लेजर प्रिंटर व झेरॉक्स मशीनसाठी लागणाऱ्या लेझर कार्ट्रेज रिफिलिंग / रि-इंजिनिअरिंग करणेसाठी दरपत्रक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५

| अ.क्र. | प्रिन्टरचे नांव | कार्ट्रेज/टोनर | दर (वस्तू व सेवा करासहित) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | REFILLING | RE-ENGINEERING | | |
| | | | | DRUM | CHIP | BLADE |
| | | **BLACK CARTAGE** | | | | |
| 1 | HP LESER JET 1022 | HP 12 A Q2612A | | | | |
| 2 | HP LESER JET P 1606 DN | HP CE278/78A | | | | |
| 3 | HP LESER JET PRO MFP M 128FN | HP CC 388A/88A | | | | |
| 4 | CANNON MF 244 DW | CANON 337 STARTER | | | | |
| 5 | CANON C3520 (NPG-67) | 17L09MA2119 (BLACK) | | | | |
| 6 | TASKALFA 3010 I KYOCERA | TK-7109 722Q002 | | | | |
| 7 | EPSON PRINTER L 1455 | INJECT PRINTER RIFFILL 140 ML (BLACK ) | | | | |
| | | Total | | | | |
| | | **COLOUR CARTAGE** | | | | |
| 8 | CANON C3520 (NPG-67) | 17K30MA2204 (YELLOW) | | | | |
| 9 | CANON C3520 (NPG-67) | 17I15MA1514 (MAGENTA) | | | | |
| 10 | CANON C3520 (NPG-67) | 17H29MA0411 (CYAN) | | | | |
| 11 | EPSON PRINTER L 1800 | INJECT PRINTER RIFFILL 70 ML (Cyan) | | | | |
| 12 | EPSON PRINTER L 1800 | INJECT PRINTER RIFFILL 70 ML (Light Cyan) | | | | |
| 13 | EPSON PRINTER L 1455 | INJECT PRINTER RIFFILL 70 ML (Yellow) | | | | |
| 14 | EPSON PRINTER L 1455 | INJECT PRINTER RIFFILL 70 ML (Magenta) | | | | |
| 15 | EPSON PRINTER L 1455 | INJECT PRINTER RIFFILL 70 ML (Light Magenta) | | | | |
| 16 | EPSON PRINTER L 1455 | INJECT PRINTER RIFFILL 70 ML (Cyan) | | | | |
| 17 | EPSON PRINTER L 1455 | INJECT PRINTER RIFFILL 70 ML (Light Cyan) | | | | |

ज्या कार्ट्रेजवर RE-ENGINEERING किंवा RECYCLING या प्रक्रीया होत नसतील तेथे लागु नाही असे नमुद करावे

( निधि चौधरी )
आयुक्त ( भा. प्र. से.)
कौशल्य, रोजगार, उद्योजकता आयुक्तालय
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय



Scanned with OKEN Scanner